# १.
# एक दिवस अचानक

*कोणत्याही अनपेक्षित घटनेनं कधीही अस्वस्थ होणार नाही, एवढं शूर कोणीही नसतं.*

ज्युलिअस सीझर

---

दि. ३१ जानेवारी २०१७ या दिवसाच्या आधीपर्यंत माझं आयुष्य छान निवांत सुरू होतं. मी अमेरिकेत चांगलं बस्तान बसवलं होतं. उत्तम नोकरी, चांगलं कुटुंब आणि सुबत्ता होती. अमेरिकेत स्थलांतर करणं, हा माझ्यासाठी मोठा सांस्कृतिक धक्का होता. उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत येण्याची माझी पहिल्यापासूनच इच्छा होती. (बरं, प्रामाणिकपणे सांगतो; मला वाटत होतं, की 'मायामी व्हाइस,' 'डायनेस्टी,' आणि 'डॅलस' यांसारख्या दूरचित्रवाणीवरील मालिकांमध्ये जसं आयुष्य दाखवतात, तसंच आयुष्य अमेरिकेत आहे आणि त्यामुळेच मी अमेरिकेकडे अधिक आकर्षित झालो होतो.) मी व्हर्जिनिया राज्यातील लिंचबर्ग येथे महाविद्यालयीन शिक्षण घेतलं. तिथं मी अमेरिकेतील दक्षिणेकडील भागातील खास आतिथ्यशीलता अनुभवली आणि चकित होऊन गेलो. तेथील लोक इतके मित्रत्वानं वागत, इतके विनम्र आणि सहृदय होते, की ते मला मुंबईच्या अगदी विरुद्ध वाटायचं. कारण मुंबईतलं आयुष्य कायम धावपळीचं असतं. अगदी न्यूयॉर्कसारखं. सुरुवातीला मला जरा संशयच यायचा. मला वाटायचं, यांना माझ्याकडून काहीतरी हवं आहे. त्यांचं आतिथ्य प्रामाणिक होतं, हे समजायला काही दिवस जावे लागले. मी सरकत्या जिन्यांवरून जात असायचो, तेव्हा एखादी अनोळखी व्यक्ती मला 'तू कसा आहेस?' असं विचारायची किंवा रस्त्यावर शेजारून जाणारी एखादी व्यक्ती मला 'हाय' करायची. या सगळ्यावर माझा विश्वासच बसायचा

नाही. एक भारतीय आणि महानगरीय म्हणून ही वागणूक मला नवी होती. कारण महानगरांमध्ये अनोळखी लोकांकडे पाहून अभिवादन करायला कुणाला वेळच नसतो. तेव्हा माझ्या मनात विचार येऊ लागला, की 'ही खरी अमेरिका आहे.' हे मला 'मायामी व्हाइस,' 'डायनेस्टी,' 'डॅलस' किंवा हॉलिवूडच्या चित्रपटांमध्ये नक्कीच कधी दिसलं नव्हतं.

३१ जानेवारी २०१७. या दिवशीची सकाळ नेहमीसारखीच कामाची उजाडली. मी 'ग्रँट थॉर्टन' या व्यावसायिक सेवा देणाऱ्या एका कंपनीमध्ये नोकरी करीत होतो. हे काम ऑफिसबाहेर राहूनही करता यायचं. त्यामुळे मी माझा दिवस लवकर सुरू करायचो. घरातील 'मास्टर बेडरूम'मध्ये बसून प्रारंभी लॅपटॉपवर ई-मेल तपासायचो. ज्या दिवसानं माझं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकलं, त्या दिवशी मी लिहलेल्या अखेरच्या काही ई-मेल मला अजूनही आठवतात. बऱ्याचशा कामासंबंधीच्या होत्या. ग्रँट थॉर्टनच्या 'डिजिटल वर्कस्पेस'चं धोरण ठरवावं आणि ती अधिक व्यापक करावी, असं सांगणाऱ्या ई-मेल मी माझा सहकारी डग कालिश आणि माझे वरिष्ठ डेव्ह बोलंड या दोघांना पाठवल्या होत्या. त्या मला स्पष्ट आठवताहेत. ही दोघंही अत्यंत सज्जन माणसं. सहृदय आणि बुद्धिमानही. काही महत्त्वाच्या वैयक्तिक ई-मेलपण आजही मला चांगल्या आठवताहेत. माझा मोठा मुलगा जय महाविद्यालयात दाखल होण्याआधी म्हणजे शरद ऋतूत आम्ही घरातले सगळे युरोपात सहलीला जायचं ठरवत होतो. त्या काळात मी धाकट्या अर्जुनसाठी घरात तळमजल्यावर ठेवायला एक 'बिलिअड्र्स टेबल'ही शोधत होतो. माझी दोन्ही मुलं बुद्धिमान आणि मृदू स्वभावाची आहेत. फार सद्गुणी. माझी पत्नी मोनिका एक गुणवान लेखिका होती. शिवाय ती स्वयंपाकही उत्तम करायची. त्या दिवशी तीही नेहमीप्रमाणे खाली तिच्या रोजच्या सकाळच्या कामांमध्ये गुंग होती.

मी बाथरूममध्ये जाऊन आलो आणि पुन्हा ई-मेलचा 'इनबॉक्स' पाहण्याच्या तयारीत असताना अचानक माझ्या डाव्या डोळ्याच्या खाली असलेला सायनस दुखायला लागला. सायनसनं मला नेहमीच त्रास दिला आहे. पण यापूर्वी इतकं कधीही दुखलं नव्हतं. जणू कोणी घाव घालावेत एवढं दुखत होतं आणि एवढ्या तीव्र वेदना या आधी कधीही मी अनुभवल्या नव्हत्या.

त्याच वेळी मोनिका वर आली. तेव्हा मी तिला मला खूप दुखतंय, असं सांगितलं. तेवढ्यात मला चक्कर यायला लागली. अंथरुणावर नीट बसताही येईना. अखेरीस मी अंथरुणावर आडवा झालो. पुरुषी स्वभावानुसार किंवा भारतीय पुरुषाप्रमाणे किंवा दोन्हीही असेल, पण आरोग्याकडे दुर्लक्ष करणं ही

आपली प्रवृत्ती असते. मला वाटत होतं, की सरळ दोन 'ॲडव्हिल' घेऊन टाकाव्या आणि छान झोप काढावी; परंतु मला घाम यायला लागला. हे नक्कीच काहीतरी वेगळं होतं. मला ते जाणवत होतं आणि मी मोनिकाला तसं सांगितलंही. आमच्या घरातल्या काहींना हृदयविकाराचा त्रास होता. त्यामुळे मला वाटलं, मला हृदयविकाराचा झटका आला आहे.

मोनिका अर्थातच खूप घाबरली. तिनं '९-१-१' या आपत्कालीन क्रमांकावर फोन लावला. शिवाय तिनं माझ्या तेव्हाच्या डॉक्टरांनाही फोन केला. सुदैवानं डॉ. पॅपस फोनवर भेटले. आत्ता या क्षणी आम्ही काय करायला हवं, असं तिनं त्यांना विचारलं. आरोग्य कर्मचारी (पॅरामेडिक्स) लगेचच येऊन हजर झाले. देव त्यांचं आणि त्यांना बोलावल्याबद्दल मोनिकाचं भलं करो. त्यामुळेच कदाचित माझा जीव वाचला असणार. कारण पक्षाघाताचा झटका येतो, तेव्हा वेळ अत्यंत महत्त्वाची मानली जाते. आरोग्य कर्मचारी वर आले आणि त्यांनी मला व्यवस्थित तपासलं. माझी लक्षणंही नीट पाहिली. माझा रक्तदाब आणि इलेक्ट्रोकार्डिओग्राम (ईसीजी) दोन्हीही ठीक होतं; परंतु आत्यंतिक वेदना, भोवळ येणं आणि घाम येणं सुरूच होतं. माझ्या शारीरिक तपासणीचं निदान ठीकठाक असल्यानं मला नेमकं काय झालंय, ते आरोग्य कर्मचाऱ्यांना समजत नव्हतं.

त्यांना वाटलं, मला तीव्र डोकेदुखीचा त्रास होत असावा, म्हणून त्यांनी मला रुग्णालयात घेऊन जायचं ठरवलं. ते माझ्यासाठी चांगलंच ठरलं. तोपर्यंत मला हृदयविकाराचा झटका आला आहे, याबद्दल माझी खात्री झाली होती. त्यामुळे मी त्यांना आधी माझी छाती तपासायला सांगितली. कारण ते मला खाली घेऊन जाणार होते. (ही एक अस्सल भारतीय वृत्ती आहे, सल्ले द्यायची.) मला आठवतंय, आरोग्य कर्मचारी सांगत होता, 'सर, तुमचं हृदय अगदी ठीक आहे.'

ते मला खाली घेऊन गेले आणि मला रुग्णवाहिकेत ठेवण्यात आलं. रुग्णवाहिकेत अगदी छान उबदार वाटत होतं. वॉशिंग्टनच्या थंडीत विशेषत: माझ्यासारख्या भारतातून आलेल्या व्यक्तीला अशी ऊब अधिकच आरामदायी वाटते. मोनिका आणि जयचे चिंताग्रस्त चेहरे मला अजूनही आठवताहेत. (आम्ही अर्जुनला झोपेतून उठवलं नव्हतं. कारण तो तसा फारच लहान होता. त्यानं मला अशा स्थितीत पाहू नये, असं आम्हाला वाटत होतं.) तेव्हा जय म्हणाला होता, 'डॅड, काहीही झालं असलं, तरी आपण त्याच्याशी सामना करू या.' किंवा तो असंच काहीसं म्हणाला होता, ते मला आठवतंय.

रुग्णवाहिकेचे दरवाजे बंद झाले आणि काही वेळातच मी बेशुद्ध झालो.

## हरवलेला महिना

पुढचे तीस दिवस मला कशाचीही जाणीव नव्हती. कारण मी 'आयसीयू'त बेशुद्धावस्थेत होतो. महिनाभरानंतर मला मोनिका आणि जयनं जे काही सांगितलं, त्यावरून काही गोष्टी माझ्या लक्षात आल्या. माझे अनेक जवळचे मित्र आम्हाला मदत करण्यासाठी 'आयसीयू'त आले होते, असंही नंतर मला समजलं.

सुदैवानं 'आयनोव्हा फेअरफॅक्स रुग्णालय' आमच्या घरापासून केवळ चार-पाच किलोमीटर अंतरावर होतं. मी तेथे पोहोचल्यावर लगेचच मला आपत्कालीन कक्षात (इमर्जन्सी रूम) नेण्यात आलं. मात्र, माझ्या लक्षणांवरून मला नेमकं काय झालं आहे, ते त्यांना समजू शकलं नाही. तेथे मला तपासणाऱ्या डॉक्टरांनी, मला आणखी काही होत आहे का, अशी चौकशी केली. मला नेमकं आठवत नाही; परंतु माझा डावा हात हवेत तरंगतोय असं मला वाटतंय, असं मी त्यांना सांगितलं. मात्र, माझं बोलणं ऐकल्यावर लगेचच त्यांनी मला 'एमआरआय'साठी किंवा 'कॅट स्कॅन'साठी (मला नेमकं माहीत नाही, यांपैकी काय ते) नेलं. माझ्या छोट्या मेंदूतील रक्तवाहिन्या फुटल्या असून मला पक्षाघाताचा झटका आला आहे, असं निदान या चाचणीमधून झालं. माझ्या मेंदूत रक्त साठत असल्यानं माझ्यावर ताबडतोब शस्त्रक्रिया करण्यासाठी मला 'ऑपरेशन रूम'मध्ये नेण्यात आलं. माझं नशीब चांगलं, की छोट्या मेंदूतील रक्तस्रावासंबंधीचे विशेष मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. निलेश व्यास यांचे कामाचे तास त्याच वेळी सुरू झाले होते. त्यांनी तासाभरातच मला शस्त्रक्रियेसाठी टेबलवर घेतलं. माझ्या डाव्या बाजूच्या मेंदूवर 'सब-ऑसीपिटल क्रॅनिक्टोमी' आणि 'हिमॅटोमा इव्हॅक्युएशन' या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. माझ्या मेंदूतील चेतासंस्थेत लघु रक्तवाहिन्या (सेरेब्रल कॅव्हर्नस मालफॉर्मेशन) अनैसर्गिकरित्या फुटल्या होत्या. त्याचा परिणाम म्हणून मला पक्षाघाताचा तीव्र झटका आला होता.

'आयसीयू'त असताना मला थोडी जाग आली. डोळे कसेबसे किलकिले केले. इथे कधी आलो, ते मला माहीत नव्हतं किंवा मध्ये किती वेळ गेला आहे, तेही मला माहीत नव्हतं. मी रुग्णवाहिकेतून निघालो, त्यानंतर मला प्रथमच थोडी शुद्ध आली होती. पण का कोण जाणे, मला वाटलं, मी बाल्टिमोरमध्ये आहे. एक वैद्यकीय व्यायामतज्ज्ञ (फिजिओथेरपिस्ट) मला तपासत होता. माझे

स्नायू आणि माझ्या ताकदीचा वेध घेत होता. तो भारतीय होता. मी त्याला त्याचं नाव विचारलं.

''मी गोपाळ.'' तो मृदू आवाजात उत्तरला. ''तू भारतातल्या कुठल्या गावचा?'' मी विचारलं. ''मुंबई.'' तो म्हणाला.

मला मुंबईची चांगलीच माहिती होती. ''मुंबईत कुठं?'' मी विचारलं.

''गोवंडी.'' त्यानं सांगितलं.

मुंबई प्रचंड मोठी आहे. पण गोवंडी हे उपनगर नेमकं कुठं आहे, ते मला माहीत होतं. तसं मी त्याला सांगितलंही. मला वाटतं, ते ऐकून त्याला खरंचच खूप आश्चर्य वाटलं असावं. मला ते त्या वेळी समजत नव्हतं. पण माझी देखभाल करणाऱ्यांशी माझं आत्मिक नातं आहे, असं मला जाणवू लागलं होतं. त्यांमध्ये गोपाळ हा पहिला होता. त्यानंतरच्या वर्षांमध्ये अशी उदार अंत:करणाची माणसं मला दोन्ही खंडांमध्ये भेटत गेली. गोपाळनं मला तपासलं आणि मित्रत्वानं माझा निरोप घेतला. तो त्याच्या पुढच्या कामासाठी निघून गेला. गोपाळ मृदुभाषी, हुशार आणि सालस होता. हे मला आजही आठवतंय. माझ्या बेशुद्धावस्थेतील महिन्यामधील ज्या दोन-तीन आठवणी मला आहेत, त्यांपैकी ही एक आहे. त्या वेळी माझा मेंदू स्वत:च बरा होत होता.

या काळातील माझी आणखी एक आठवण म्हणजे, विचित्र पण स्पष्ट भ्रमांची एक मालिका. त्यातील एक भ्रम म्हणजे, मी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उपाध्यक्ष पेन्स यांच्यासमवेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची भेट घेण्यासाठी चाललो होतो. आणखी एक भास म्हणजे, मी ट्रम्प यांच्या विमानातून अध्यक्ष, त्यांच्या पत्नी, त्यांचा मुलगा बॅरन आणि मुलाची आया यांच्यासमवेत मुंबईला जात होतो. हे विमान बाळासाहेब ठाकरे यांच्या मुंबईतील समुद्रकिनारी असलेल्या बंगल्यात उतरलं. मग तेथून आम्ही सर्व जण रात्रीच्या भोजनासाठी गेलो. मिसेस पेन्स यांचा कुत्राही दिवसभर त्यांच्यासमवेतच होता.

मी कोणाला तरी विचारलं, 'हा डेबी यांचा कुत्रा आहे का?' (मिसेस पेन्स यांचं नाव डेबी आहे की आणखी काही याची मला तोपर्यंत कल्पना नव्हती. किंवा त्यांच्याकडे कुत्रा आहे की नाही, हेही माहीत नव्हतं; परंतु माझ्या भ्रमामध्ये त्यांचं नाव 'डेबी' असं होतं. त्यांचं नाव केरन आहे, असं मला नंतर समजलं. पेन्स पती-पत्नीकडे नंतर खरंचच एक कुत्रा आला. पण त्या वर्षीच्या अखेरीस.)

आणखी एका भ्रमामध्ये माझ्या क्षतिग्रस्त मेंदूनं अनेक विस्कळीत घटकांची जंत्री एकत्र आणली. मी एका रुग्णवाहिकेत होतो आणि कोणत्या तरी कारणासाठी मी फिलाडेल्फियातून जात होतो. गेल्या काही वर्षांत मी फिलाडेल्फियामध्ये काही वेळा कामासाठी गेलो होतो. पण त्या शहराशी माझा यापेक्षा अन्य काही संबंध कधी आला नव्हता. रुग्णवाहिकेत माझ्यासमवेत ॲरिझोनात राहणारा माझा साडू सुमीर, माझी मेहुणी आरती आणि त्यांची मुलगी शिवानी हे तिघंही होते. मी शिवानीला कशावरून तरी रागावत होतो. खरं तर हे माझ्या स्वभावाच्या पूर्णपणे विरुद्ध होतं. पण त्या वेळी मला तसा भ्रम झाला होता. त्या फेब्रुवारीमध्ये मला 'आठवत' असलेल्या काही घटनांपैकी ही एक घटना. माझ्या प्रवासांविषयीच्या भ्रमांपैकी आणखीही अनेक तपशील आहेत. पण मला आता ते नीटसे आठवत नाहीत. हे दोन भ्रम मात्र माझ्या मनावर कोरले गेले आहेत. जणू काही तसं खरंच घडलं होतं.

हे भ्रम मला इतके स्पष्ट कसे आठवतात, असं मी डॉ. व्यास यांना नंतर विचारलं होतं. त्यावर, शस्त्रक्रियेदरम्यान मला अधिक तीव्रतेची औषधं देण्यात आली होती, असं कारण त्यांनी दिलं. कदाचित अतिदक्षता विभागात 'थेरपी डॉग'ना (पीडित अथवा आजारी व्यक्तींना आराम वाटावा, यासाठी प्रशिक्षण दिलेले श्वान) आणलं जात असे. म्हणूनच कदाचित त्यातील एक श्वान मला डेबीचा श्वान असल्याचा भ्रम झाला असावा. मी रुग्णालयात असताना आरती मला भेटायला आली होती. कदाचित माझ्या मेंदूनं तिची नोंद घेतली असावी आणि तिच्यासमवेत सुमीर व शिवानी या दोघांना जोडलं असावं.

या भ्रमांव्यतिरिक्त मला जाणवत असलेली दुसरी गोष्ट म्हणजे मी रुग्णवाहिकेत झोपलेला असणं. बाहेरची बोचरी हवा आतमध्ये आलेली मला आठवत होती. ज्यांनी कोणी अमेरिकेच्या या राजधानीला थंडीच्या मोसमात भेट दिली असेल, त्यांनी हे थंड तापमान अनुभवलं असेल. मी काहीही बोलू शकत नव्हतो की हालचाल करू शकत नव्हतो. हे सगळं झालं, ते मी बोलण्याच्या किंवा हालचाल करण्याच्या आधी. आणि मग अखेरीस मी 'आयनोव्हा फेअरफॅक्स रुग्णालया'तून बाहेर पडून 'कॅपिटल बेल्टवे' या राष्ट्रीय महामार्गावरून 'आयनोव्हा माउंट व्हर्नन रुग्णालया'कडे निघालो. 'आयनोव्हा फेअरफॅक्स रुग्णालया'त मी सुमारे एक महिना बेशुद्धावस्थेत होतो. आता 'आयनोव्हा माउंट व्हर्नन रुग्णालया'त माझ्यावर शस्त्रक्रियेनंतरचे उपचार करण्यात येणार होते. माझी प्रकृती पूर्वपदावर येण्यासाठी येथे माझी देखभाल करण्यात येणार होती. हीच प्रक्रिया अत्यंत कठीण होती. पण मला पुढे नेणारी

आणि माझ्यात बदल घडवणारी होती. हे मी पूर्वी कधीही अनुभवलं नव्हतं.

पुढील सर्व प्रकरणांमध्ये ही प्रक्रिया उलगडणार आहे. ती आजही सुरू आहे.

या प्रक्रियेत मी या देशातून त्या देशात गेलो. देखभाल करणारे कर्मचारी, मदतनीस यांच्याशी माझा संपर्क आला. त्या सगळ्यांनी माझा माणुसकीवरील विश्वास अधिक वाढवला आणि हा विश्वास वंश, सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी किंवा राष्ट्रांच्या सीमेपलीकडे नेणारा होता. हे वरवरचे भेद बाजूला ठेवले, तर विस्मयजनक घटना घडू शकतात, असं माझ्या लक्षात आलं. या वचनाचं मी जितंजागतं प्रतीक आहे. माझा हा दृष्टिकोन तयार होण्याआधी मला नेमकं काय झालं होतं, याचा विचार करायला हवा. विशेषत: बेशुद्धावस्थेतून बाहेर पडल्यावर मी पूर्णपणे असहाय होतो, त्याचा विचार करता, ती खरंचच सोपी गोष्ट नव्हती.

• • •

*काहीही घडू शकतं. कोणत्याही वेळी काहीही घडू शकतं.*

रोझ बर्न




**समीरनीती**

तुमच्याकडे असलेल्या चांगल्या गोष्टींचा रोज विचार करा आणि त्याची जाणीव सतत स्वत:ला करून द्या.